चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
२४ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# ०५ आरोपीसह ३१ लक्ष ३८ हजाराचा अवैध दारूचा मुद्देमाल हस्तगत चंद्रपुर पोलीसांची विषेश कार्यवाही

दिनांक २३/०४/२०१९ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आणि मुल पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी वाहनाने सिंदेवाही ते चार्मोशी मार्गे दारूची तस्करी करीत आहे. अशी माहिती मिळाताच मुल येथील पोलीस पथकाने तात्काळ चार्मोशी कडे जाणाऱ्या मार्गावर सापळा रचुन एक दुचाकी आणि एक चारचाकी टाटा एस वाहनास थांबवुन सदर वाहनाची झडती घेतली असता, वाहनामध्ये ३८ पेटया देशी दारू किं. ३,८०,०००/—रू, विदेशी दारू ८ पेटया किं. १,२०,०००/—रू आणि एक दुचाकी व चारचाकी टाटा एस वाहन किं. ४,६०,०००/—रू असा एकुण ९,६०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन मुल येथे नोंद करण्यात आला असुन ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढिल तपास मुल पोलीस करीत आहे.

तसेच पोलीस स्टेशन वरोरा येथील पोलीस पथकाने नाकेबंदी दरम्यान एका मारूती सुजुकी क. एम. एच ४० के आर १८६० आणि टाटा इंडिगो कार क. एम. ए. ३२ सी ४६८१ वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ३४ पेटया देशी दारू किं. ३,४०,०००/—रू, १२ पेटया आफीसर चॉईस कंपनीची विदेशी दारू किं. १,७२,८००/—रू, दोन चारचाकी वाहन किं. २,१०,०००/—रू आणि दोन मोबाईल फोन किं. ६,०००/—रू, असा एकुण ७,२८,०००/—रू, चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर गुन्हयात दोन आरोपींना अटक करण्यात आले असुन पुढिल तपास वरोरा पोलीस करीत आहे.

पोलीस स्टेशन भद्रावती येथील पोलीस पथकाने गोपनीय माहितीवरून पोस्टे भद्रावती परिसरात एक चारचाकी एक्स युव्ही वाहनाची झडती घेतली असता २५०० निपा देशी दारू किं. २,५०,०००/—रू आणि एक वाहन किं. १२,००,०००/—रू असा एकुण १४,५०,०००/—रू चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन भद्रावती येथे नोंद करण्यात आला असुन पुढिल तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, पोलीस स्टेशन भद्रावती, मुल आणि वरोरा पोलीस पथकाने पार पाडली.

---